## HWT Team Leads Community Clean-Up Drive Across Goa

In a powerful display of unity and environmental responsibility, the **Hindustan Waste Treatment (HWT)** team recently conducted a large-scale **clean-up drive across multiple locations in Goa**. This initiative, part of our ongoing **community development and sustainability efforts**, reflects HWT's commitment to creating cleaner and healthier surroundings beyond the boundaries of our plant.

What made this initiative truly special was the wholehearted participation from every level of our team — from **plant managers to machine operators, fitters, and support staff**. Together, they rolled up their sleeves and worked side by side, collecting waste, restoring public spaces, and spreading awareness about the importance of cleanliness and waste segregation.

The drive not only helped rejuvenate local areas but also strengthened our sense of teamwork and purpose. It was a moment of pride for all of us at HWT — demonstrating that our mission of responsible waste management extends into the very communities we serve.

At **Hindustan Waste Treatment**, we believe that sustainable change begins with collective action. Through initiatives like this, we continue to inspire and engage our people to take small steps that lead to a cleaner, greener tomorrow.

Gallery


CAR GLASS




CAR GLASS


CAR GLASS




AADESH TILES



# पेडे सर्कल ते ग्रीनपार्क रस्त्यावरील कचऱ्याची स्वच्छता

## हिंदुस्तान वेस्ट ट्रिटमेंट प्रा. लि. प्रकल्पातर्फे, दक्षिण गोव्यातही 'वसुधा' कचरा प्रकल्प

**म्हापसा : हिंदुस्तान वेस्ट ट्रिटमेंट प्रा. लि. प्रकल्पातर्फे पेडे ते ग्रीन पार्क दरम्यान रस्ता स्वच्छता मोहिमेस उपस्थित अधिकारी गार्गी रावते बाजूस आशिष पिळणकर व स्वच्छता कामगार.**

प्रतिनिधी
म्हापसा

हिंदुस्तान वेस्ट ट्रिटमेंट प्रा. लिमिटेड प्रकल्पातर्फे कर्मचारीवर्ग व स्वच्छता कामगार यांच्या सहयोगाने प्रतिकात्मक रस्ता स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. याद्वारे पेडे म्हापसा सर्कल ते गिरी ग्रीन पार्क दरम्यानच्या रस्त्याची झाडू मारून व आजूबाजूचा कचरा उचलून पूर्णतः स्वच्छता करण्यात आली.

कार्यक्रमास मुख्य उपस्थिती मा. अंकित यादव (गोवा वेस्ट मॅनेजमेंट कॉर्पोरेशन – मॅनेजिंग डायरेक्टर) यांनी उपस्थित लोकांना प्रोत्साहित केले. तसेच कार्यक्रमास गिरी पंचायतीचे उपसरपंच श्रेया नाईक व सचिव उपस्थित होते. गोवा वेस्ट मॅनेजमेंट कॉर्पोरेशनचे मार्गदर्शन आणि सहयोगाने मागील ८ वर्षांपासून H.W.T ओला कचरा आणि सुका कचरावर सायंटिफिक प्रक्रिया करत आहे. समाजात कचरा या समस्येविषयी जनजागृती आणि संवेदनशीलता वाढावी यासाठी प्लांट हेड गार्गी रावते यांनी रस्त्यावर उतरून प्रतिकात्मक स्वच्छता मोहीम राबवून 'एक कदम स्वच्छता की ओर' या राष्ट्रीय अभियानास पुष्टी दिली. संपूर्ण जगभरात आणि भारतात कचरा व्यवस्थापनाचे अनेक प्रकल्प आहेत परंतु मोहिमेच्या (As a plant Head) सुरू असलेल्या अशा या प्लांटच्या हेड गार्गी रावते, महिला सशक्तीकरणाचे उत्तम उदाहरण आहे.

उत्तर व दक्षिण गोवा दोन्ही ठिकाणी कचरा प्रकल्प असून ७५ कर्मचारी कचऱ्याची विल्हेवाट लावतात. दक्षिण गोव्यातही आमचा 'वसुधा' हा कचरा प्रकल्प असून तेथे १०० डिपीडी कचरा येतो असे त्यांनी स्पष्ट केले. गोव्यात ७०० टन कचरा होतो. त्यातील ३५० टन कचऱ्याची आम्ही विल्हेवाट लावतो असे त्यांनी सांगितले.

गिरी उपसरपंच श्रेया नाईक यांनी या सर्व १२० कामगारांचे आभार मानले व आम्हाला पंचायत पातळीवर अशा उपक्रमाची आवश्यकता असल्याचे सांगितले. आशिष पिळणकर यांनी स्वागत केले व आभार मानले.

### १५० कामगार करतात रस्ता स्वच्छतेचे काम

हिंदुस्तान ट्रिटमेंट प्रकल्पाच्या अधिकारी गार्गी रावते यावेळी पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या की, हिंदुस्तान ट्रिटमेंट प्रकल्प दररोज २५० डिपीडी ओला आणि सुका कचरा गोळा करते. हा १५० कामगारांच्या साहाय्याने आम्ही पेडे ते गिरी दरम्यान ही रस्ता स्वच्छता मोहीम हाती घेतली असल्याचे त्या म्हणाल्या. दररोज येऊन आम्ही येथे कचरा साफ करू शकत नाही मात्र या मोहिमेंतर्गत आम्ही असा संदेश देऊ शकतो की गोवा हा सुंदर आहे. जास्तीत जास्त स्वच्छता व हिरवळ ठेवण्याची आमची सर्वांची जबाबदारी आहे. गोवा सरकारनेही याची दखल घेऊन आम्हाला प्रोत्साहन दिले आहे. गोवा कचरा प्रकल्पाचे व्यवस्थापक अंकीत यादव यांनीही आम्हाला सहकार्य केल्याचे त्या म्हणाल्या. असे कार्यक्रम राज्यात झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले.










